सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**(गृह विभाग)**

**न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई**

DIRECTORATE OF FORENSIC SCIENCE LABORATORIES, MUMBAI

**विदयानगरी,हंसभुग्रा मार्ग, कलीना,सांताक्रुझ (पूर्व) मुंबई - ४०० ०९८.**

VIDYANAGARI, HANS BHUGRA MARG, KALINA, SANTACRUZ (EAST), MUMBAI-400 098

**दूरध्वनी क्र.** 022-26670755/58/965

Tel. : 022-26670755/58/965

**Email id :** dir.fsl@maharashtra.gov.in

जा. क्र. मुं.गो/१४७/२०२५ दिनांक:२७.०२.२०२५

## ** तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना दस्ताऐवज पडताळणीबाबत सूचना **

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या निवडसूचीत नमूद उमेदवारांच्या कागदपत्रे/प्रमाणपत्र पडताळणीबाबत---

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनेवरील सरळसेवा भरतीमधील गट-क संवर्गाची टि.सी.एस. द्वारे दि.19.09.2024, दि.20.09.2024 व दि.23.09.2024 या कालावधीत पदभरतीकरीता घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणानुक्रमाच्या तसेच सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन व गुणानुक्रमे तात्पुरती निवडसूची (प्रतिक्षायादीसह) संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि.२७.०२.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तात्पुरती निवडसूचीत समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी संबंधित पदासाठी लागू असलेले तसेच ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड केलेले दस्तऐवज / प्रमाणपत्रे जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, वयासंबंधीचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र आणि इतर सर्व मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह खालील नमूद ठिकाणी व वेळी समक्ष उपस्थित रहावे.

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **दस्तऐवज पडताळणी दिनांक व वेळ** | **स्थळ** |
|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** |
| 1 | वैज्ञानिक सहायक, गट-क | दिनांक 10.03.2025 सकाळी 10.00 वा. | न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, हंसभुग्रा मार्ग, कलिना, विद्यानगरी, सांताक्रुझ (पू.), मुंबई - 400 098. |
| २ | वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र), गट-क | | |
| ३ | वरिष्ठ लिपिक (भांडार), गट-क | | |
| ४ | व्यवस्थापक (उपहारगृह), गट-क | | |
| ५ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक, गट-क | दिनांक 11.03.2025 सकाळी 10.00 वा. | |
| ६ | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक, गट-क | | |
| ७ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण) गट-क | | |

कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. आरक्षित जागेकरीता अर्ज केला असल्यास त्या पुष्ठयर्थ आवश्यक असणारी सर्व मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

सदर उमेदवारांनी सोबत आणावयाच्या कागदपत्रे/प्रमाणपत्रांची यादी खालील तक्त्यात दिलेली आहे.

| **अ.क्र.** | **कागदपत्रे** |
|---|---|
| 1 | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वंयघोषणापत्र (विहित नमूनयात |
| 2 | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| 3 | वयाचा पुरावा<br>(जन्म दाखला / इयत्ता 10 वी.चा शाळा सोडल्याचा दाखला |
| 4 | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा<br>(सक्षम प्राधिकारी दाखला) |
| 5 | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात/जात वैधता प्रमाणपत्र |
| 6 | नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (चालु आर्थिक वर्षातील) |
| 7 | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| 8 | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| 9 | खेळाडूंसाठी आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| 10 | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| 11 | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| 12 | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या 865 गावातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिका-यांचा विहित नमुन्यातील दाखला |
| 13 | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| 14 | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा (इ.10 वी उत्तीर्ण प्रमाणपत्र) |
| 15 | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन (विहित नमुन्यात) |
| 16 | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| 17 | MS-CIT अथवा समक्ष प्रमाणपत्र |
| 18 | टंकलेखन प्रमाणपत्र (आवश्यक असेल तेथे) |
| 19 | अनुभव प्रमाणपत्र (संबंधित आस्थापना / HR विभागाचे)<br>ज्या पदांकरीता अनुभव आवश्यक आहे अथवा अनुभवास प्राधान्य आहे, अशा पदांकरीता उमेदवारांने अनुभव नमूद केला असल्यास –<br>1. नियुक्ती आदेश<br>2. अनुभव प्रमाणपत्र |

खालील परिस्थितीत उमेदवारांना निवडीकरीता अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवारांच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

1. कागदपत्रे/प्रमाणपत्र पडताळणीनंतर उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास
2. कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीसाठी अपूर्ण दस्तऐवज /प्रमाणपत्र असल्यास तसेच चुकीची कागदपत्रे/ प्रमाणपत्रे आढळून आल्यास, कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीसाठी उपरोक्त दिवशी जे उमेदवार उपस्थित राहणार नाहीत, अशा उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही, असे गृहीत धरुन त्यांची निवड रद्द केली जाईल व त्यानंतर अशा उमेदवारांच्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
3. कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीसाठी उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.
4. कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीसाठी बोलावले याचा अर्थ आपली निवड झाली आहे असा नसून आपली निवड विचाराधीन आहे.

कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणी प्रक्रियेबाबत संचालनालयाचा निर्णय अंतिम राहील व सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील.

( स्वाक्षरी/- )
संचालक तथा सदस्य सचिव निवड समिती
न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई